# Goa Dhoot

Date : 10-Apr-08
Headline ; Arthaeon starts Artha Money Service
Event : Press conference to announce the launch of Arthaeon Financial Services
Location : Mumbai

## ‘अर्थइऑन’ तर्फे अर्थमनी सेवा सुरू

**पणजी, दि. ११ :** अर्थइऑन फायनान्शिअल सर्व्हिसेस कंपनीने भारतात किरकोळ वित्तीय सेवा क्षेत्रात अर्थमनी नावाची/ एक आगळीवेगळी सेवा सुरू केली आहे. ही सेवा म्हणजे विविध वित्तीय उत्पादने एकाच ठिकाणी मिळणारे एक मनी सुपरमार्केटच ठरणार आहे. प्रत्येक भारतीय ग्राहकांस मग तो निवासी असो वा अनिवासी ही सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. अर्थमनी सेवा कंपनीच्या सर्व शाखा, वितरण शृंखला, इंटरनेट व टेलिफोन माध्यमाद्वारे उपलब्ध केली आहे.

एकाच छताखाली सर्वप्रकारची वित्तीय उत्पादने उपलब्ध झाल्यामुळे ग्राहकांना विविध उत्पादनांचा तुलनात्मक अभ्यास करून सुयोग्य उत्पादन निवडण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होणार आहे. अशा प्रकारची एकछत्री सेवा देणारी अर्थइऑन ही पहिलीच भारतीय कंपनी आहे.

गेल्या तीन वर्षांपासून भारत ९ टक्के दरात विकास साध्य करीत असल्यामुळे वित्तीय सेवांना देशात अभूतपूर्व मागणी आली आहे.

अर्थमनी सेवा मात्र सर्वव्यापक सेवा देण्यास सज्ज आहे. अर्थइऑन वित्तीय सेवा कंपनीचे सीइओ — व्यवस्थापकीय संचालक सुरेश रंगराजन म्हणाले, भारतात सुबत्ता आल्यामुळे किरकोळ ग्राहकांच्या शिखात अभूतपूर्व पैसा आला आहे. त्यामुळे पैसा व्यवस्थापन व वैयक्तिक गुंतवणुकीबद्दल जागरुकता निर्माण करण्याची गरज उत्पन्न झाली आहे.